# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.७/२०२४** **दिनांक ०३/०७/२०२४**

**स्थळ- साई निवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ४.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **बुधवार दि.०३.०७.२०२४ रोजी दुपारी ४.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह** येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१०६९/२०२४,दि.२७.०६.२०२४ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **बुधवार दि.०३.०७.२०२४ रोजी दुपारी ४.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह** येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** **दि.१३.०६.२०२४ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३८७** दि.१३.०६.२०२४ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्तामध्ये खालील प्रमाणे दुरुस्त्या करुन सदरचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

१. निर्णय क्र.३३३- नोंद घेतली.

या ऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.
निर्णय क्र.३३३- आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये केलेल्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेण्यात आली व आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये कमाल व्याजदर देणा-या राष्ट्रीयकृत बॅंकामध्ये मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

**विषय नं.२** **संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील रिक्त पदांवर तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित वेतन/ मानधनावर ११ महिने कालावधीसाठी अधिकारी/कर्मचारी नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.३८८** तहकुब.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.३** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कार्यकाळातील पूर्वलक्षी प्रभावाने वाहतुक भत्ता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३८९** प्रतिनियुक्तीवर असलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना शासन निर्णयानुसार अनुज्ञेय भत्त्याची रक्कम ते संस्थानच्या सेवेत प्रतिनियुक्तीवर रुजु झालेल्या दिनांकापासून देण्यात यावी.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.४ श्री साईबाबा महाविद्यालय प्राचार्य पद भरणेबाबत.

निर्णय क्र.३९० सेवा प्रवेश नियम मंजूर झाल्यानंतर कायम प्राचार्य पद भरतीबाबत कार्यवाही करावी.
(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.५ शासनाने संस्थानात अनुकंपा भरती मर्यादा १० टक्के ऐवजी २० टक्के करण्यास दिलेल्या मान्यतेनुसार दि.०१/०१/०२०२२ ते दि.३१/१२/२०२३ या कालावधीतील उर्वरीत १० टक्के पदांवर अनुकंपा प्रतिक्षायादीवरील पात्र कुटुंबीयांना गट क व गट ड चे पदांवर संस्थान सेवेत सामावून घेणेबाबत.

निर्णय क्र.३९१ शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करावी. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.६ वाहन कर मुदतीत भरण्यामध्ये उशीर झाल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत लेखाशाखा विभागाने चौकशी करुन सादर केलेल्या अहवालाबाबत.

निर्णय क्र.३९२ दि.२६.०८.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०० याची पुर्तता करण्यात यावी.
(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.७ श्री साई मंदिर, पेठ वडगाव, कोल्हापूर व दावानगेरे, कर्नाटक येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेबाबत.

निर्णय क्र.३९३ तहकुब. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.८ साईबाबा पालखी सोहळा शिर्डी यांना श्री क्षेत्र पंढरपुर पायी दिंडी सोहळयासाठी संस्थानतर्फे सहकार्य मिळणेबाबत.

निर्णय क्र.३९४ सर्व समावेशक धोरण तयार करुन शासन मान्यतेसाठी समितीसमोर सादर करावे.
(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.९ श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२४ करीता किर्तनकार निश्चित करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९५ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१० श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२४ मधील सांस्कृतीक कार्यक्रमांकरीता कलाकार व त्यांचे मानधन निश्चित करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९६ विनामुल्य सेवा देणा-या कलाकारांची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.११ सामुदायिक श्री साईसच्चरित्र पारायण सोहळा-२०२४ (वर्ष ३०) नेहमीचे प्रथा, परंपरेप्रमाणे साजरा करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९७ निव्वळ होणारा खर्च दर्शवुन दुरुस्त प्रस्ताव चक्रीय पध्दतीने मान्यतेसाठी सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१२ संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांचा विमा उतरविणेबाबत.**

**निर्णय क्र.३९८ संस्थानचे कायम कर्मचा-यांशी प्रस्तावाचे अनुषंगाने चर्चा करुन प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.१३ श्री साईबाबांचे दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांचे विनंतीनुसार वैयक्तिक साईसेवक योजना सुरु करणे व पुर्वीच्या साई सेवक योजना नियमावलीमध्ये अंशत: बदल करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९९ तहकुब.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.१४** सन २०२४-२५ करीता (माहे जुलै,२०२४ ते जून २०२५ अखेर) बुंदी प्रसाद तयार करून उत्पादन तारखेचे शिक्के मारून पॅकींग करून घेणेकामी उक्त्या मजुरीची अंदाजे रक्कम रुपये १.१६ कोटी मात्रचे खर्चाची ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४०० तहकुब.**

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.१५** मंदिर परिसरातील गुरुस्थान निंबवृक्षाची विद्यापीठ शास्त्रज्ञांकडून पाहणी अहवालाबाबत.

**निर्णय क्र.४०१ तहकुब.** **(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**विषय नं.१६** लेंडीबागेमध्ये पाण्याचे कारंजे व धबधब्याचे नुतनीकरणासह नवीन पाण्याचे कारंजे देणगी स्वरुपात करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४०२ तहकुब.** **(कार्यवाही- बगीचा विभाग)**

---

**विषय नं.१७** संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.११६/५ क्षेत्र ३.५० आर व त्यामधील इमारत क्षेत्र २६६.७४ चौ.मी. आर.सी.सी.बांधकाम शिर्डी नगरपरिषद हद्दीमधील जिल्हा परिषद मोठेबाबा शाळेकरीता जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

**निर्णय क्र.४०३ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१८** संस्थानचे पिंपळवाडी रोड लगतचे जनरेटर रुम शेजारील मोकळया जागेत मोबाईल कॅमेरा क्लोकरूम सुरू करण्यास परवानगी मिळणेबाबत चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉइज क्रेडीट को-ऑफ सोसायटी लि. शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/२१७/२०२४ दि.०९.०१.२०२४.

**निर्णय क्र.४०४ तहकुब.** **(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१९ नवीन दर्शनरांग इमारतीमध्ये साईभक्तांचे सोईसाठी व सेवेसाठी तळमजल्यावरील गाळा मिळणेबाबत चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉइज क्रेडीट को-ऑफ सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/२१८/२०२४ दि.०९.०१.२०२४.**

**निर्णय क्र.४०५ तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२० नवीन दर्शनरांग इमारतीत पाणी व थंडपेय विक्री स्टोअर चालविण्यास परवानगी मिळणेबाबत चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉइज क्रेडीट को-ऑफ सोसायटी लि. शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/ २१९/२०२४ दि.०९.०१.२०२४ रोजीचे पत्र.**

**निर्णय क्र.४०६ तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२१ मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीचे सर्व्हे नं.५४,५५ मध्ये साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरत्या स्वरुपात वाहनतळाची व्यवस्था सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.४०७ तहकुब. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२२ शिर्डी शहरातील बिरेगाव शिव विकास योजना १८.० मी.रुंद (स.नं.२०६ व २०७) रस्त्याचे कामाबाबत एफएसआय/टीडीआर प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४०८ तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२३ श्री साई प्रसादालय परिसरात सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी या बॅंकेचे ATM सुविधा सुरु करणेकामी जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.४०९ तहकुब. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२४ व्दारावती भक्तनिवास विभागाकडील जुन्या फायबर फोम टु फोल्ड मॅट्रेस जाहीर लिलावाने विक्री करणेकामी करावयाच्या कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४१० तहकुब.**

**(कार्यवाही-व्दारावती भक्तनिवास)**

---

**विषय नं.२५ सोलापुर चादर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४११ तहकुब.**

**(कार्यवाही-साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.२६ साठा संपुष्टात येत असलेल्या संस्थान प्रकाशीत प्रकाशनांचे पुर्नमुद्रण करणेसाठी अंदाजे रक्कम रु.४,२०,००,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४१२ तहकुब.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.२७ श्री साईबाबांचे विविध प्रकारचे 3D फोटो छपाईकामी अंदाजे रक्कम रु.२०,००,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४१३ तहकुब.** **(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.२८ श्री साईबाबा संस्थानमार्फत साईभक्तांकरीता उपलब्ध सोयी-सुविधाबाबत Documentary तयार करुन संस्थानचे अधिकृत वेबसाईट व सोशल मिडीया अकाऊंटवर प्रसारीत करणेकामी या क्षेत्रातील संस्थेची नेमणुक करणेबाबत.**

**निर्णय क्र.४१४ तहकुब.** **(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२९ "SHRI SAIBABA SANSTHAN TRUST" नामक संस्थेमार्फत https://shirdisaitrust या बनावट वेबसाईटद्वारे साईभक्तांची फसवणूक/दिशाभुल होत असल्याने सबंधीतांविरुद्ध कायदेशीर कारवाई करणेबाबत.**

**निर्णय क्र.४१५ तहकुब. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.३० श्री साईबाबा शैक्षणिक संकुल (निमगाव को-हाळे) येथील इमारती व ऑडीटोरीयम या ठिकाणी शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाकरीता आवश्यक संगणकीय नेटवर्कची उभारणी करणेकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४१६ तहकुब. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.३१ संस्थानचे नवीन शैक्षणिक संकुल इमारतीमध्ये अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा कार्यान्वीत करणेकामी लागणारे तद्अनुषंगीक तांत्रीक साहित्य (Internal Cables, MDF Box, Cable Infra from Installed Gateway Rack to Each Building, Telephone Outlet Socket, Rawal Plug, Screw, Casing Capping Patti etc.,) खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४१७ तहकुब. (कार्यवाही-ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग)**

---

**विषय नं.३२ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार संस्थानचे दुरध्वनी यंत्रणेकरीता Manual for Procurement for Consultancy and other Services-2017 नुसार Avaya B2B AMC Support कामी Avaya कंपनीचे अधिकृत पुरवठाधारक यांचेकडून संस्थानचे विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४१८ तहकुब. (कार्यवाही- ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग)**

---

**विषय नं.३३ संस्थानचे नवीन शैक्षणिक संकुलामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.४१९ तहकुब. (कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.३४ श्री साईबाबा महाविद्यालयात (Ad-hoc) सहा.प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक यांचे मानधन वाढीबाबत.**

**निर्णय क्र.४२० तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.३५ श्री साईबाबा महाविद्यालयात संगणकशास्त्र प्रयोगशाळेसाठी तसेच इतर शाखांचे कार्यालयीन कामकाजासाठी संगणक खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२१ तहकुब. (कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.३६ साईभक्त कै.दगडू (भाऊ) गायके या नावामध्ये त्यांच्या वडीलांचे नाव समाविष्ट करणेबाबत साईभक्त कै.दगडू (भाऊ) बापु गायके यांचे वशंज (श्री. बाबुराव गंगाधर गायके व इतर,रा.शिर्डी) यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४२२ तहकुब. (कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.३७ दि.०१.०१.२०२४ ते दि.३१.०३.२०२४ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीकरिता प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४२३ संस्थानचे असे धोरण नसल्यामुळे प्रस्ताव अमान्य. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.३८ निराधार अनाथ विद्यार्थी व वृध्दांना आश्रय देणा-या एनजीओ संस्थांना संस्थानमार्फत आर्थिक अनुदान देणेबाबत.**

**निर्णय क्र.४२४ तहकुब. (कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.३९** **आर्थिक वर्ष २०२४-२५ ते २०२६-२७ या ३ आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्तीकामी प्राप्त लेखापरिक्षण संस्थांपैकी तीन लेखापरिक्षण संस्थांची नावे अंतिमतः निवडीकरिता शासनाकडे पाठविण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२५** **प्रस्ताव मंजुर. शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा. (कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४०** **आर्थिक वर्ष २०२४-२५ ते २०२६-२७ या ३ आर्थिक वर्षाकरिता GST विषयक, संबंधीत कामकाज करणेकामी GST सल्लागार नेमणूक करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फी चा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२६** **प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४१** **आर्थिक वर्ष २०२४-२५ ते २०२६-२७ या ३ वर्षाकरिता पूर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणूक करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थाच्या फी चा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२७** **प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४२** **आर्थिक वर्ष २०२४-२५ ते २०२६-२७ या ३ आर्थिक वर्षाकरिता आयकर विषयक TDS सबंधीत कामकाज करणेकामी आयकर सल्लागार नेमणूक करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थाच्या फी चा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२८** **प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४३** **श्री साई सच्चरित पारायण सोहळा-२०२४ कार्यक्रमासाठी साई आश्रम भक्तनिवास परिसरात मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२९** **तहकुब.** **(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४४** **संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै. मधील नवीन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा कालव्यामधुन पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता येणारे रक्कम रु.२,३८,०९,९५४/- मात्रचे खर्चास तसेच याकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तसेच मा.विधी व न्याय, विभाग महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेऊन विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३०** **तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४५** **श्री साईबाबा हॉस्पिटल एम.आर.आय.विभागाचे समोर रुग्ण व रुग्णांचे नातेवाईकांचे ऊन, वारा व पाऊसापासून संरक्षण होणेसाठी बैठक व्यवस्थेसह शेड उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.४३१** **तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४६** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) इमारतीचे दक्षिणेकडील बाजुस गर्दीचे काळात साईभक्तांची निवासव्यवस्था करणेकामी तसेच इतर वेळी वाहनांचे पार्कींगसाठी कायमस्वरुपी टेक्साईल फॅब्रीकचे शेड उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.४३२** **तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४७** **शिर्डी मंजुर विकास योजनेतील शिर्डी-निमगाव शिव रस्ता १५ मी.रुंदीकरण रस्ता (नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिमेकडील श्री साईबाबा संस्थान साई प्रसादालयाकडे जाणारा) भूसंपादनासाठी शिर्डी नगरपरिषदेचे रु.१.६६ कोटी निधी मागणी प्रस्तावाबाबत.**

**निर्णय क्र.४३३** **तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४८** **मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८३ मध्ये उभारलेल्या शैक्षणिक संकुल प्रकल्पातील शालेय इमारतीकरीता वाढीव ६२ नग डिजीटल स्मार्ट बोर्ड खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४३४ तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४९** **श्री साईबाबा संस्थान मार्फत नव्याने लेजर शो (Light & Sound Show) प्रकल्प BOT (Build– Operate-Transfer) तत्वावर उभारणेसाठी सल्लागार Rhino Engineers Pvt.Ltd., Ahmadabad व श्री. नितीन कुलकर्णी यांचे सादरीकरण पाहून सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.४३५ तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५०** **संस्थानचे साईनाथ मंगल कार्यालय व साई उद्यान लगतचे शिर्डी सर्व्हे नं.४/२ ब २ येथील केशव मंदिराचे जागेवर Tea Complex इमारतीचे बांधकाम करणेकामी आर्किटेक्ट राजेंद्र गट्टानी, अमरावती यांचे सादरीकरण पाहून याकामी येणा-या रक्कम रु.२.०९ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३६ तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५१** **वाहन विभागाकडील अपघातग्रस्त रुग्णवाहीका वाहन क्र.MH-17-BD-5601 (बोलेरो रुग्णवाहीका) विमा धारक दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीस हस्तांतरीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.४३७ तहकुब.**

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**विषय नं.५२** **श्री साई प्रसादालयातील एअर व्हेंटीलेशन व एक्झॉस्ट यंत्रणा व आय टी विभाग सर्व्हर प्रेजिसन ए.सी. यंत्रणा नवीन बसविणेकामी तांत्रिक सल्लागार नेमणुक करणेकरीता निम्नत्तम दरधारक मे.Moticulous counsulting services, Rohtak, Haryana यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३८ तहकुब.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.५३** **जुना पिंपळवाडी रोडवरील पॉलीकोर्बोनेट शिट शेड काढून साईबाबा भक्तनिवासस्थान पार्किंगच्या जागेमध्ये पुर्नःउभारणी करणेस तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३९ तहकुब.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.५४** **मौजे निघोज येथील पालखी निवारा परिसरातील संस्थानला देणगी दाखल मिळालेल्या इमारतींकरीता संस्थानचे साई धर्मशाळा येथुन पाणी पुरवठा करणेसाठी डी.आय.पाईपलाईन टाकणेकरीता येणारे रु.६६.९१ लक्ष मात्रचे निव्वळ अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४० तहकुब.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.५५** **श्री साईबाबा मंदिर व मंदिर परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी ठेकेदार मे.एच.डी. फायरकॉन टेक्नो प्रा.लि.पुणे यांचे सहावे व अंतिम बिलानुसार झालेल्या कामाचे एकूण रक्कम (Final value of Workdone) रु.२,११,८१,०५६/- मात्र मंजुर होणेस व त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.२६,०४,४४८/- मात्र अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४१ तहकुब.**

**(कार्यवाही-फायर ॲन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.५६ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे मशिनरी/ उपकरणे खरेदीकामी प्राप्त निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४४२ दरामध्ये आलेल्या तफावतीबद्दल खुलाशासह फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५७ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे 5 para & 7 para Multipara Monitor खरेदीकामी निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४४३ दरामध्ये आलेल्या तफावतीबद्दल खुलाशासह फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५८ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आलेनंतर टप्प्याटप्प्याने पुन्हा नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.४४४ प्रस्ताव मंजुर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.५९ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वैद्यकीय संचालक व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिक्षक ही रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात जाहिरातीव्दारे भरणेबाबत.**

**निर्णय क्र.४४५ मागील वैद्यकीय संचालक यांचे नियुक्तीनंतर आता ते अपात्र कसे ठरतात याबाबतचे खुलाशासह प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६०** **श्री साईबाबा धर्मादाय हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये सप्टेंबर-२०२३ ते मार्च-२०२४ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.४,२६,३३,७१७/- नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४६** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६१** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.८,१३,००२/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४७** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६२** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.२,४५,३४९/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४८** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६३** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१३,०१,८९८/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४९** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६४** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन, हाताळणी, प्रक्रिया व विल्हेवाट करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५०** **प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.६५** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे मशिनरी/उपकरणे खरेदीकामी प्राप्त निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४५१** **दरामध्ये आलेल्या तफावतीबद्दल खुलाशासह फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६६** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Ventilator खरेदी करणेकामी प्राप्त निम्नतम दराने पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४५२** **दरामध्ये आलेल्या तफावतीबद्दल खुलाशासह फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६७** **श्री साईबाबा हॉस्पिटलचे मंजुर उपचार दरातील व संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांना कामाच्या प्रमाणात देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्यामध्ये सुधारणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५३** **तहकुब.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६८** **श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने नेत्रपेढी (आय बॅंक) सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५४** **प्रस्ताव मंजुर. सी.ए. दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय/विधी विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

१. सन २०२४-२५ करीता संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणेबाबत राबविण्यात आलेल्या ई-निविदांबाबत निर्णय होणेस व नवीन ठेकेदारास नेमणूक होऊन त्यांने कर्मचारी पुरवठा करेपर्यंत सध्याचे ठेकेदार यांना सध्या आहे त्या अटी-शर्ती व दरामध्ये मुदतवाढ देणेबाबत.

निर्णय क्र.४५५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. पुढील वर्षाच्या खर्चासाठी सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात आलेली असल्याने आणि त्यातुनच हा खर्च होणार असल्याने पुन्हा सी.ए.दाखल करण्याची आवश्यकता नाही.

(कार्यवाही-कामगार विभाग)

--------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.२ श्री साईभक्तांना देण्यात येणारे प्रसादभोजनातील चपाती व पुरीच्या गहू आटयात फोर्टीफाईड प्रिमीक्स मिक्स करणेबाबत.

निर्णय क्र.४५६ अन्न व औषध प्रशासन यांचा अभिप्राय घेऊन प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

--------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.३ श्री साई प्रसादालयात मोफत देण्यात येणारे प्रसाद भोजन सशुल्क करणेबाबत.

निर्णय क्र.४५७ तहकुब.

(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

--------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.४ मोतीचुर लाडूंची १ नग व ३ नगांचे लाडू पाकीटाऐवजी २ नग लाडूची पाकीटे पॅकींग करुन त्यांची रु.२०/- या दराने विक्री करणेबाबत.

निर्णय क्र.४५८ तहकुब. (कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

--------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५ संस्थान व रुग्णालये विभागाकडील मालमत्ता विमा, कर्मचारी विमा व श्री साईभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणाबाबत.**

**निर्णय क्र.४५९ प्रस्ताव मंजुर. सी.ए. दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी. सी.ए. मान्यतेच्या अधिन राहून कार्यादेश देण्यास व प्रिमीयमची रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६ माहे मार्च-२०२४ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४६० नोंद घेतली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७ श्रींचे उत्सव कालावधीमध्ये मंदिर परिसरात ठेवण्यात येणा-या पदयात्री पालखी मंडळाबाबत.**

**निर्णय क्र.४६१ पर्यायी जागेच्या व्यवस्थेसह प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.८ संस्थानचे दोन्ही रुग्णालयाकरीता नवीन अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त HIMS संगणक प्रणाली कार्यान्वीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६२ मे.सुवर्णा टेक्नोसॉफ्ट, हैद्राबाद यांनी प्रस्तावीत केल्याप्रमाणे दोन्ही रुग्णालयाकरीता संगणक प्रणाली कार्यान्वीत करण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. चौथ्या वर्षापासून प्रती रुग्णालय पाच लाख देण्याऐवजी दोन्ही रुग्णालयासाठी पाच लाख देण्याच्या उद्देशाने संबधीताशी चर्चा करावी. अटी शर्तीमध्ये उल्लेख करणे**

**आवश्यक आहे की,यदा कदाचीत भविष्यात संस्थानने हे काम अन्य पुरवठाधारक कंपनीस दिले तर या पुरवठादाराने विनामुल्य सुलभरित्या त्या कंपनीस डेटा मायग्रेट करुन द्यावा. सी.ए. दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.३८७ ते ४६२ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं.७.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**